# कमर जलालाबादी - भाग २



प्रभात फिल्मचा ‘चाँद’ हा चित्रपट आणि त्यातील मंजू या गायिकेने गायलेले ’दो दिलोंकी ये दुनिया’ हे गाणे तुम्हाला आठवत असेल, तर ते गाणे कमर यांनी लिहिले होते. हुस्नलाल-भगतराम यांनी या चित्रपटाला संगीत दिले होते. मिळालेल्या या संधीनंतर या दोघांबरोबर कमर यांनी भरपूर काम केले. त्यांनी या दोघांसाठी लिहिलेली ही काही गाणी - ’देख ली ऐ दुनियावाले’ (’बालम’/सुरैय्या), ’हम जैसा कौन होगा’ (’गौना’/लता), ’अगर दिल किसीसे’ (’गौना’/रफी), ’तेरे नैनोंने चोरि किया’ (’प्यार की जीत’/सुरैय्या), ’एक दिल के टुकडे हजार हुए’ (’प्यार की जीत’/रफी), ’वो पास रहे या दूर रहे’ (’बडी बहन’/सुरैय्या), ’बिगडी बनानेवाले’ (’बडी बहन’/सुरैय्या), ’चुप चुप खडे हो, जरूर कोई बात है’ (’बडी बहन’/लता आणि प्रेमलता), ’ओ सनम...दिल तुझे पुकारे सनम सनम’ (’सनम’/रफी आणि सुरैय्या), ’सुन मेरे सजना’ (’आँसू’/लता आणि रफी), ’माही ओ दुपट्टा मेरा दे दे’ (’मीना बझार’/लता आणि रफी), ’ऐ मेरी जिंदगी, तुझे ढूँढू कहाँ’ (’आदिल-ए-जहांगीर’/तलत, लता), ’आपने छीन लिया दिल’ (’फर्माईश’/रफी आणि मीना मंगेशकर), ’मुहब्बत की हम चोट खाये हुए है’ (’फर्माईश’/तलत), ’है जिंदगी कितनी हसीन’ (’अप्सरा’/आशा आणि तलत), ’भूल जा, सपने सुहाने भूल जा’ (’राजधानी’/तलत, लता). कमर यांनी हुस्नलाल-भगतराम यांच्यासाठी गाणी नुसतीच लिहिली नाहीत, तर ती अत्युत्तम लिहिली. उदाहरण द्यायचेच तर ’सुन मेरे सजना’ या गाण्यातील एका कडव्यात त्यांनी ’बजे जिस रोज शहनाई, समझ लेना बारात आई, तो अरमानों की नगरी मे दुल्हनियाँ बन के जाना !’ अशी लिहिलेली काव्यपंक्ती म्हणजे त्यांच्या अद्भुत प्रतिभेने मन:चक्षूसमोर उभे केलेले अप्रतिम चित्रच वाटते !

त्यांनी ओ. पी. नय्यर आणि कल्याणजी-आनंदजी यांच्या समवेतही भरपूर काम केले परंतु आता

आधी आपण त्यांनी इतर संगीतकारांसाठी लिहिलेली गाणी पाहूया. अनिल विश्वाससाठी 'जलती निशानी' मध्ये कोरस सोबत हेमंतकुमार यांनी गायलेले 'के राही है जिंदगी' हे गाणे, तसेच त्याच चित्रपटात लताने गायलेले 'रुठ के तुम जो चल दिये' ही गाणी त्यांनीच लिहिली आहेत. पं. अमरनाथ यांच्यासाठी 'मिर्झा साहिबान' मधलं दुराणीनी गायलेलं 'खायेगी ठोकरे ये जवानी'. गुलाम हैदरसाठी 'बदनाम ना हो जाये' ('शहीद'/सुरिंदर कौर), श्यामसुंदरसाठी 'साजन की गलियाँ छोड चले' ('बाजार'/लता) आणि 'ऐ मोहब्बत, उनसे मिलने का बहाना' ('बाजार'/रफी आणि लता) हे देखील. सरदार मलिकसाठी 'मेरा जला रात भर दिया' ('चमक चाँदनी'/सुधा). सज्जाद हुसेनसाठी 'ये कैसी अजब दास्ताँ हो गयी है' ('रुस्तम सोहराब'/सुरैय्या). सुधीर फडकेंसाठी त्यांनी 'खुश है जमाना आज पहली तारीख है ('पहली तारीख'/किशोर) लिहिलं. आणि सोनिक-ओमींसाठी 'दोनोंने किया था प्यार मगर' ('महुआ'/रफी), इ. त्यांनी अशी शेकडो सुंदर गीते लिहिली आहेत, परंतु ती ऐकताना ही अप्रतिम गाणी कुणाच्या लेखणीतून उतरली आहेत ते रसिकांच्या लक्षात येत नाही.

अनिल विश्वास यांनी संगीतबध्द केलेल्या आणि तलतने 'वारिस' मध्ये अतिशय सुंदर गायलेल्या 'कभी है गम, कभी खुशियाँ, यही तो जिंदगानी है' सारखी गाणी. हुस्नलाल-भगतराम यांच्या 'अपना ही घर लुटने, दिवाना जा रहा है, खुद शम्मा को बुझाने परवाना जा रहा है' ('आदिल-ए-जहांगीर'/रफी) सारखी गाणी. त्या काळातील वातावरण थोडे उदास होते, त्यामुळे तेव्हाच्या काव्य आणि संगीतातही ते परावर्तित होत असे.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next

wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com